# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२४-२५/१७६

व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील दिनांक १३ ऑक्टोबर, २०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बारावी सभा रविवार, दिनांक १३ ऑक्टोबर, २०२४ तसेच भारतीय सौर दिनदर्शिकेनुसार २१ आश्विन १९४६ रोजी दुपारी ३:०० वाजता ऑनलाईन माध्यमाने आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | अनुपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | डॉ. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | अनुपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | डॉ. प्रसाद कारंडे (कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | (सी.ए.) हर्षल वाघ (वित्त व लेखा अधिकारी ) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली. मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

श्रद्धांजली :

**श्री. रतन नवल टाटा**

सुप्रसिद्ध भारतीय उद्योगपती श्री. रतन नवल टाटा हे थोर समाज सेवक होते. त्यांनी शैक्षणिक, सामाजिक व संशोधन क्षेत्रास खूप मदत केली. दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ रोजी वृध्दापकाळाने त्यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षाचे होते.

**श्री. बाब सिद्दीकी**

महाराष्ट्र विधानसभा सदस्य श्री. बाब सिद्दीकी यांची दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ रोजी हत्या करण्यात आली. श्री. बाब सिद्दीकी हे नॅशनल कॉग्रेस पार्टीचे वरिष्ठ नेते होते. मृत्यूसमयी ते ६६ वर्षाचे होते.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दिनांक ५ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | सदर प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करण्यात यावे असे ठरले. | |
| २ | Minutes of offline and zoom meeting of the Building and Works Committee held on 04th October 2024 at 03:00 p.m. | IPEMDU |
| ठराव | दिनांक ०४ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बिल्डिंग व वर्क्स समितीच्या बाब क्र. १,२,३,४,५,७,८,१०,११,१२,१३,१४,१५ मंजूर करण्यात आले. तसेच बाब क्र. ३ हे जानेवारी २०२५ मध्ये सादर करावे असे ठरले आणि बाब क्र.६ स्ट्रक्चरल ऑडिट करून सदर ऑडिट रिपोर्ट आल्यानंतर फेरसादर करावे, असे ठरले. बाब क्र. ९ मधील अनु क्र. १ ला मंजुरी देण्यात आली व अनु. क्र. २ ला विहित दंड आकारून मुदत वाढ देण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच बाब क्र. १० मध्ये पी.एम.उषा प्रोजेक्ट मधील कामासाठी जो निधी मंजूर आहे, त्या मर्यादेतच मंजुरी देण्यात आली. तसेच या सर्व प्रोजेक्ट्सना व्ही.जे.टी.आय. या संस्थेतील मॉनेटरिंग कमिटीची मान्यता घेण्यात यावी. बाब क्र.१३ मध्ये आर्किटेकची नियुक्ती करण्यात यावी, असे ठरले. सदर ठराव हा आजच्या बैठकीत कायम करण्यात आला आहे. | |

प्रा.डॉ. कविता लघाटे यांनी मुंबई विद्यापीठाच्या आजच्या पर्चेस कमिटीच्या महत्वाच्या बाबी बद्दल सभागृहास माहिती दिली. मुंबई विद्यापीठाच्या सर्व आस्थापनावर, सर्व इमारतीच्या साफ-सफाई करिता निविदा काढण्याची प्रक्रिया सुरु आहे. साधारण अकरा कंत्राटदारानी सहभाग नोंदवला. त्यापैकी दहा कंत्राटदार तांत्रिकदृष्ट्या पात्र आहेत. सर्वात कमी दर देण्याऱ्या कंत्राटदाराला चर्चा करण्यास लवकरच बोलाविण्यात येणार आहे. निविदा तयार करण्याच्या कामासाठी व्ही.जे.टी.आय. ची खूप मदत झाली आहे. या मध्ये काही राहिले असल्यास वर्क ऑर्डर मध्ये ५०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येईल. वर्क ऑर्डर देताना ऑडिट कसा करता

येईल तसेच स्वच्छतेच्या बाबतीत तक्रार नोंदवण्यासाठी टेक्नॉलॉजीचा वापर कसा करता येईल तेही लक्षात घेणार आहोत. आजच्या पर्चेस कमिटीमध्ये सदर बाब मान्य करण्यात आली आहे. उपरोक्त बाब व्यवस्थापन परिषदेच्या सर्व सदस्यांना माहितीसाठी सादर करण्यात आली.

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

May be approved

कुलसचिव

प्र- कुलगुरू

मा. कुलगुरू

25 OCT 2024